# PRACTICE PAPER FOR MARATHI
# PAPER-3

## SECTION A-GRAMMAR

१) पुढील वाक्ये कंसातील सूचनाप्रमाणे बदलून लिहा. ५

१)यावर्षी परीक्षा लवकर होणार. (वर्तमानकाळ करा)

२)निसर्गात रंगाची उधळण झाली. (भविष्यकाळ करा)

३)मला याची लाज का वाटत आहे? (भूतकाळ करा)

४)जकमी झालेल्या वागाने मान टाकलि. (वाक्य शुद्ध करा)

५)एके दिशी ऐक फोन आला. (वाक्य शुद्ध करा)

## SECTION B-COMPOSITION

२)वर्गातील लाकडी वस्तूंची मोडतोड केल्याबद्दल माफी मागणारे पत्र मुख्याध्यापकांना लिहा. ८

किंवा

परीक्षेवेळी होत असलेले ध्वनिप्रदूषण बंद करण्याबाबत विनंती करणारे पत्र पोलिस अधिका-याला लिहा.

३)खालील उतारा वाचून त्याचा एक तृतीयांश सारांश लिहा. ७

‘मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे’ याचा अर्थ सामाजिक जीवनाची माणसाला आवड आहे एवढाच आहे. सामाजिक जीवनाची प्रवृत्ती माणसाच्या ठिकाणी उपजत असल्याने मात्र आजपर्यंतच्या इतिहासात दिसत नाही. स्वार्थ, अहंभाव, संकुचितता या गुणांमुळे विनाशाकडे माणसाची उपजत प्रवृत्ती असल्याचे दिसले. संघटित जीवन जगण्यासाठी त्याला मोठा आटापिटा करावा लागतो. त्यात ब-याच वेळा अपयशही येते. समाजाची संघटना करणारे महापुरूष ठरतात. यावरून संघटित जीवन किती दुर्मिळ आहे हे लक्षात येते. संघटित जीवनाचे फायदे घटत असले तरी माणसाची त्याकडे उपजत प्रवृत्ती नसते ही गोष्ट दुःखकारक आहे.

४)खालील कथा लिहा १०

लोभी माणूस- देवाची भक्ती - प्रसन्न- सोन्याची मागणी- झोळीत सोने- खाली पडले तर माती होईल- झोळी भरते- जड होऊन फाटते- सगळी माती होणे

## SECTION C-COMPREHENTION

५) खालील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

शेवटी आपण हेही लक्षात घेतलं पाहिजे, तुम्ही कितीही विरोध केलात तरी जागतीकरण व्हायचं असलं तर होईल.एकच भाषा यायची असेल तर येईल.इंग्रजी राष्ट्रभाषा व्हायची असेल तर होईल.पण आपला हा नैतिक हक्क आहे, की याला विरोध करणं.मी मधे ठामपणे उभा राहिलो तर माझ्यापलीकडे ते किरण जाऊ देणार नाही, असी जर प्रत्येकाने परिस्थिती निर्माण केली तर कदाचित आपल्याला देशी भाषा वाचवता येतील.ज्याला आपण बहुसांस्कृतीकता म्हणतो; ते आपले वैभव आहे, वारसा परंपरा आहे, मूल्य आहे.यूनेस्कोने हयुमन राईटस् रेकॉर्डमध्ये हीसुद्धा एक कसोटी लावली पाहिजे.हया कलमामुळे आपला देश इग्लंड, अमेरिका वगैरेच्या पुढे जाईल.परंतु भाषा नाहिसे करणारे नेमके हेच लोक युनेस्कोमध्ये कसोटया लावणारे आहेत.ते अशा त्यांना न परवडणा-या कसोटया घालू देणार नाहीत.ते म्हणतीलच की बहुभाषिकत्वाचा, बहुसांस्कृतिकतेचा मानवी हक्कांशी काय संबध येतो? जे मरायचे असले तर ते मरतीलचा.आपण आपली इंग्रजी भाषा रेटत राहायची.आज अतिशय उच्च विदयाविभूषीत हिंदुस्थानी इंजिनियर डॉक्टरलासुद्धा अमेरिकेत जायचं असेल तर त्याला इंग्रजीची परिक्षा दयावी लागते.ती परीक्षा दिल्याशिवाय शिरू देता येत नाहीत.इतकं काटेकोर भाषिक धोरण जागतिकीकरण देणा-या तिकडच्या सर्वच देशांमध्ये सर्रास लावलं जातं आणि आपण जे उदारमतवाद म्हणून या सगळया भाषा सांभाळत आहोत, त्यांना वाईट दिवस आले आहेत

<u>प्रश्नः</u>

१.जागतीकरणाच्या संदर्भात आपला नैतिक हक्क कोणता? २

अ.जे होईल ते होऊ देणे.
ब.जागतिकीकरणाला विरोध करणे.
क.ठाम उभे राहणे.
ड.इंग्रजी राष्ट्रभाषा म्हणून स्वीकारणे.

२.देशी भाषा कशा वाचवता येतील? २

अ.माझ्यापलिकडे मी इंग्रजीच्या आग्रहाचा एकही कीरण जाऊ देणार नाही असे ठरवणे.
ब.देशी भाषांचा उपयोग करणे.
क.छोटया छोटया देशी संस्कृती वाचवणे.
ड.आपली मूल्ये जपणे.

३.आपले वैभव कोणते आहे? २

अ.आपला वारसा
ब.इंग्रजी भाषा
क.आपली बहुसांस्कृतीकता
ड.मानवी हक्क

४.कशामुळे आपला देश इतरांच्या वर जाईल? २

अ.इंग्रजीस विरोध करण्याने
ब.वारसा परंपरा मूल्ये या कसोटया हयुमन राईटस् रेकॉर्डमध्ये समाविष्ट करण्याने
क.इंग्लंड अमेरिका यांच्या पुढे जाण्याने
ड.परदेशी जात राहिल्याने

५.जागतिकरणाचा आग्रह धरणा-या देशात कोणते धोरण स्वीकारले गेले आहे? २

अ.वारसा तपासण्याचे
ब.इंग्रजीची परीक्षा घेण्याचे
क.उदारमतवादी वर्तनाचे
ड.यूनेस्कोच्या नियमानुसार वागण्याचे

## SECTION D-LITERATURE

६)खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा १५

१)ज्योतीरावांच्या निधनाच्या वेळी सावित्रीबाई कशा वागल्या?
२)ज्योत्स्ना कदम यांच्या घरात कोणत्या अदचणी होत्या?
३)आडाच्या दिशेने चालू लागल्यावर लेखकाच्या मनात कोणते विचार आले?
४)खॉसाहेबांनी भास्करची परीक्षा कशी घेतली?
५)हरिहररावांनी स्वातंत्र्यसंग्रामात कोणते काम केले?

७) अ)खालील कोणत्याही एका प्रश्नांचे उत्तर एका वाक्यात लिहा २

१)कवी भक्तिभावाने कपाळाला काय लावणार आहे?
२)कवीने कशाचा वसा घेतला आहे?
३)अंधार पखाली ही कविता कोठून घेतली आहे?

ब)खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नांचे उत्तर थोडक्यात लिहा ३

१)आत्मसन्माने जगण्यासाठी कवीने कोणता मार्ग सांगितला आहे?
२)अंधार पखाली या कवितेत कवीने कोणती अपेक्षा व्यक्त केली आहे?
३)श्रमिकांनी काया करावे असे कवीला वाटते? का?

क)खालीलपैकी कोणत्याही दोन संदर्भाचे स्पष्टीकरण करा. १०

१."व्हावे एवढे लहान सारी मने कळो यावी"

२."हातातल्या ज्योतीसाठी नको कुणाची "

३."यावी लाविता कपाळी भक्तिभावनाने माती"

८) अ)अंगठा या कथेतून कोणता बोध होतो? ६

ब)प्रीतमच्या घरच्या परिस्थीतीचे वर्णन करा. ४